# वारली चित्रकलेची कार्यशाळा

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील ठाणे जिल्हापरिषदेच्या कुंडणपाडा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वनशक्ती या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने मोफत वारली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी वारली चित्रकलेचे महत्त्व समजून घेतले. तसेच विद्यार्थ्यांनी चित्रे देखील काढली. सुमारे चाळीस विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. वनशक्तीचे प्रकल्प अधिकारी चित्रा म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना वारली चित्रकलेचे प्रशिक्षण दिले.

लोकसत्ता

Sat
htt